# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. २१/०८/२०१०

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा शनिवार दिनांक २१/०८/२०१० रोजी सभा सुचना क्र. ०७ दि. १६/०८/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. दिनेश नलावडे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. दिनेश दगडू नलावडे | -- | सभापती |
| २) | श्रीम. ग्रिटा स्टिफन फॅरो | -- | सदस्या |
| ३) | श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद | -- | सदस्या |
| ४) | श्री. याकुब ईस्माईल कुरेशी | -- | सदस्य |
| ५) | श्री. अनिल दिवाकर सावंत | -- | सदस्य |
| ६) | श्री. जुबेर इनामदार | -- | सदस्य |
| ७) | श्री. मदन उदितनारायण सिंह | -- | सदस्य |
| ८) | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | -- | सदस्य |
| ९) | श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी | -- | सदस्य |
| १०) | श्री. चंद्रकांत म्हात्रे | -- | सदस्य |
| ११) | सौ. सुधा व्यास | -- | सदस्या |
| १२) | सौ. वर्षा भानुशाली | -- | सदस्या |
| १३) | श्री. बर्नट अल्बर्ट डिमेलो | -- | सदस्य |
| १४) | सौ. निर्मला सावळे | -- | सदस्या |
| १५) | सौ. अनिता पाटील | -- | सदस्या |

**गैरहजर सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |

**याकुब कुरेशी ( प्र. सभापती)** :-

सचिव साहेब, सभेच्या कामकाजाला सुरूवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शनिवार दि. २१/०८/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०७, दि. १६/०८/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ५४, वाहन खरेदी करणेबाबत

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, मा. महापौर साहेबांना आपण जे वाहन देतो. ते त्यांच्या व्यतिरिक्त इतर ही कोणी वापरतात का? म्हणजे ज्या वेळेला आचार संहिता असते.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ज्यावेळेला आचार संहिता असते तर त्या वाहनाचे डिक्वेजेशन कलेक्टर साहेब करतात. त्यानुसार ते वापरतात.

**अनिल सावंत :-**

मग, आपण हे महापौर साहेबांसाठी किती साली वाहन घेतल होत?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

२००६ ला घेतल होत. त्याला ४ वर्ष झाले. त्यावेळेस स्थायी किंमत ६ लाख ६८ हजार होती.

**अनिल सावंत :-**

मग, आता त्या वाहनाची कंडीशन काय आहे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब, आतापर्यंत त्याला ३.५० लाख रू. खर्च झालेला आहे. अजून ब-याच वाहनाचा खर्च जवळपास १ लाख रू. दुरूस्त करण्यासाठी लागतो.

**अनिल सावंत :-**

या चार वर्षामध्ये जवळ-जवळ ५ लाख रू. खर्च झाला. त्या वाहनावर. मग, याला जबाबदार तुम्ही कोणाला धरता?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

वाहन आहे. त्या वाहनाचा वापर इतका होतो. त्याप्रमाणे.......

**अनिल सावंत :-**

किती जण वापरतात?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सन्मा. महापौर साहेब वापरतात. दुसर कोण वापरतात. मा. महापौर साहेबच वापरतात.

**अनिल सावंत :-**

जुन्या वाहनाच किती रनिंग झाल्या आहेत?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

जवळपास ९० हजार पर्यंत झाल होत.

**अनिल सावंत :-**

२ लाख ७६ हजार रनिंग झाला ४ वर्षामध्ये स्वीफ्ट गाडीच आणि अजूनही एकदम कंडीशनमध्ये ती गाडी आहे. हे जे ड्रायव्हर आहेत. ते फक्त स्टेरिंगवर बसुन स्टाटर मारायचच काम करतात. त्या गाडी मध्ये ऑईल, पाणी, रेग्युलर सर्व्हिस ही जबाबदारी कोणाची?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

जबाबदारी ड्रायवरचीच असते.

**अनिल सावंत :-**

एच.ओ.डी. जबाबदार धरा. कुठच्याही वाहनावर ३० हजार रू. पेक्षा जास्त खर्च झाला. तर हे जे एच.ओ.डी. आहेत त्यांना जबाबदार धरा.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. उपायुक्त साहेब आता आपण जी काही वाहन विकत घ्याल. त्याला सर्व्हिस जी आहे. ती जी ॲथोराईज सर्व्हिस स्टेशन्स आहे. तिथुनच करून.......

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

तिथुन म्हणुनच केलेली आहे. म्हणुनच किंमत जास्त आहे. दुसरीकडे केली ना तर कमीमध्ये मिळते ॲथोराईज वाले नाही ते काम काढतात आणि लाख-लाख, सव्वा लाख. २ वेळेला मध्यंतरी खरेदी केली ना. त्याच्यावर सव्वा लाख रू. तिथेच खर्च केलेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

५ वर्षामध्ये ३.५० लाख रू. खर्च झाला. आमच्याकडेही गाड्या आहेत. आमचा खर्च एवढा होतच नाही.

**अनिल सावंत :-**

आता आम्ही ह्याला मंजूरी देतो. पण पुढे एच.ओ.डी. ला जबाबदार धरा. मिरा भाईंदर महानगरपालिका वाहन विभागामध्ये एकुण ८३ वाहने होती. त्यापैकी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या १० वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या एकुण १५ वाहनांची लिलावाद्वारे विक्री करणेकरिता दि.२९/०६/२०१० रोजीचा मा.महासभेत याबाबत चर्चा करुन सर्वांनुमते ठराव क्र.१५ दि.२९/०६/२०१० अन्वये व मा.स्थायी समिती ठराव क्र.३७ नुसार एकुण १५ वाहने निर्लेखित केली आहेत.

मा.महापौर सो., यांना महानगपालिकेच्या शासकीय कामकाजाकरिता महानगरपालिकेचे वाहन क्र.एम.एच.०४ एएन-८५०(बलेनो) हे वाहन वापरण्यास देण्यात आले आहे. सदर वाहन सन २००६ सालांत खरेदी केली असुन सदर वाहनाची दुरुस्ती करुन देखील वाहनामध्ये वारंवार बिघाड होत असल्याने वाहनावर खर्च जास्त प्रमाणात होत आहे. सदर वाहन नादुरुस्त स्थितीत असुन वाहनांमध्ये वारंवार बिघाड होत असल्याने नियोजित कार्यक्रमांचा ठिकाणी पोहोचणेस विलंब होत असल्याचे दि.०६/०८/२०१० रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

दि.३०/०७/२०१० रोजीच्या मा.महासभेमध्ये झालेल्या चर्चानुसार मा. महापौर सो., मा.उपमहापौर सो., मा.आयुक्त सो, व मा.स्थायी समिती सभापती सो., यांना महानगरपालिकेच्या शासकीय कामकाजाकरिता महानगरपालिकेचे वाहन पुरविण्यात यावीत उर्वरित वाहने मंजुर दरानुसार भाडयाने घेवुन पुरविण्यात यावीत. सदर चर्चेनुसार मा.महापौर सो., यांनी संदर्भिय पत्रान्वये कळविल्यानुसार नविन वाहन खरेदी करणेबाबत मंजुरीकरीता विषय मा.स्थायी समितीपुढे घेण्यात यावा याबाबत उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये कळविले आहे.

महापौरास राज्य मंत्र्याचा दर्जा असतो त्यानुसार महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक वाहन-१०.८/प्र.क्र.१०/०८/विनियम दि.२१/०७/२००८ अन्वये मा.राज्यमंत्री मंत्री दर्जावरील पदाधिकारी यांना एकुण रु.७,५०,०००/- पर्यंत नविन वाहन खरेदी करता येते. नविन वाहन खरेदी करताना थेट कंपनीकडुन खरेदी करुन अतिरिक्त २ वर्षाकरिता वॉरंटी घेण्यात यावी. नविन वाहन खरेदीकरिता अंदाजपत्रकात तरतुद नाही. परंतु सन २०१०-११ या सालात १५ वाहने निर्लेखित केलेली आहेत त्यापोटी रक्कम रु.१७,००,०००/- इतकी जमा झालेली आहे. सदर रक्कमेतुन मा.महापौर यांना मुळ किंमत रुपये सात लाख पन्नास हजार व त्यावर इतर टॅक्स व साहित्यासाठी होणाऱ्या खर्चास नविन वाहन खरेदीबाबत मा.स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**बर्नड डिमेलो :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

या ठरावामध्ये माझी अशी सुचना आहे की, वाहन खरेदी करताना त्या कंपनीतुन वाहन खरेदी केली जाणार त्याला एक्स्टेन्डेड वॉरन्टीच्या अंतर्गत खरेदी करावी.

**प्रविण पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. आता आपण मागे वाहनांचा लिलाव केला होता. त्याच्यानंतर काही वाहने आहेत ती आपल्याकडे नाही. शववाहिनी होती. तर शववाहिनी आहे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आपण विषय घेणार आहोत.

**प्रविण पाटील :-**

अशी कुठली वाहने आहेत की, लिलाव केल्यानंतर आपल्याकडे आहेतच नाही. भाईंदर पूर्वेच बघा. ॲम्ब्युलन्स गेले की, कारण भाईंदर पूर्वेला ते घ्यायला जातात. अशी कुठली वाहने आहेत की, आपण त्याचा लिलाव केला. आणि पालिकेत ती वाहने नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

डंम्पर लागतील. कारण रस्त्यावरच अतिक्रमण हटवायच असत म्हणुन डंम्पर लागतील. आता शववाहिनी ती निर्लिखित केली ती एक नविन घ्यायची आहे. आता त्याचा प्रस्ताव आपण स्थायी
समिती मध्ये आणु.

**प्रविण पाटील :-**

म्हणजे आता शववाहिनी नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

हो नाही आहे.

**प्रविण पाटील :-**

शववाहिनी ही महत्वाची आहे. ती अत्यावश्यक सेवा आहे. मा. महापौर साहेबांच्या वाहनांचा विषय आला तर शववाहिनीचा पण विषय आणायला पाहिजे होता.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

काल परवाच निर्लिखित ऑर्डर दिली. पुढच्या स्थायी समितीमध्ये विषय आणतो. जो पर्यन्त जुने वाहने निर्लिखित करत नाही. तो पर्यंत नवीन वाहनांचा प्रस्ताव आणता येत नाही. ते आताच निर्लिखित केलेल आहे. तसे आता ऑर्डर दिलेले आहे. विषय आलेला आहे. आता तो पुढच्या स्टॅण्डींग मध्ये तो विषय घेवू.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

प्रभाग क्र. ४ मध्ये जी शववाहिनी उभी असते. ती भाईंदरवाले घेवून जातात.

**याकुब कुरेशी ( प्र. सभापती) :-**

आवश्यकता असेल आणि नेली तर काय फरक पडेल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

एका ॲम्ब्युलन्सच ॲक्सीडेन्ट झालेल होत ती दुरूस्तीला टाकलेली होती. ती ५-६ दिवसाने दुरूस्त होवून येईल.

**याकुब कुरेशी ( प्र. सभापती ) :-**

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ५४ :-**

वाहन खरेदी करणेबाबत.

**ठराव क्र. ४७ :-**

आता आम्ही ह्याला मंजूरी देतो. पण पुढे एच.ओ.डी. ला जबाबदार धरा. मिरा भाईंदर महानगरपालिका वाहन विभागामध्ये एकुण ८३ वाहने होती. त्यापैकी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या १० वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या एकुण १५ वाहनांची लिलावाद्वारे विक्री करणेकरिता दि.२९/०६/२०१० रोजीचा मा.महासभेत याबाबत चर्चा करुन सर्वानुमते ठराव क्र.१५ दि.२९/०६/२०१० अन्वये व मा.स्थायी समिती ठराव क्र.३७ नुसार एकुण १५ वाहने निर्लेखित केली आहेत.

मा.महापौर सो., यांना महानगपालिकेच्या शासकीय कामकाजाकरिता महानगरपालिकेचे वाहन क्र.एम.एच.०४ एएन-८५०(बलेनो) हे वाहन वापरण्यास देण्यात आले आहे. सदर वाहन सन २००६ सालांत खरेदी केली असुन सदर वाहनाची दुरुस्ती करुन देखील वाहनामध्ये वारंवार बिघाड होत असल्याने वाहनावर खर्च जास्त प्रमाणात होत आहे. सदर वाहन नादुरुस्त स्थितीत असुन वाहनांमध्ये वारंवार बिघाड होत असल्याने नियोजित कार्यक्रमांचा ठिकाणी पोहोचणेस विलंब होत असल्याचे दि.०६/०८/२०१० रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

दि.३०/०७/२०१० रोजीच्या मा.महासभेमध्ये झालेल्या चर्चानुसार मा. महापौर सो., मा.उपमहापौर सो., मा.आयुक्त सो, व मा.स्थायी समिती सभापती सो., यांना महानगरपालिकेच्या शासकीय कामकाजाकरिता महानगरपालिकेचे वाहन पुरविण्यात यावीत उर्वरित वाहने मंजुर दरानुसार भाडयाने घेवुन पुरविण्यात यावीत.

सदर चर्चेनुसार मा.महापौर सो., यांनी संदर्भिय पत्रान्वये कळविल्यानुसार नविन वाहन खरेदी करणेबाबत मंजुरीकरीता विषय मा.स्थायी समितीपुढे घेण्यात यावा याबाबत उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये कळविले आहे.

महापौरास राज्य मंत्र्याचा दर्जा असतो त्यानुसार महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक वाहन-१०.८/प्र.क्र.१०/०८/विनियम दि.२१/०७/२००८ अन्वये मा.राज्यमंत्री मंत्री दर्जावरील पदाधिकारी यांना एकुण रु.७,५०,०००/- पर्यंत नविन वाहन खरेदी करता येते. नविन वाहन खरेदी करताना थेट कंपनीकडुन खरेदी करुन अतिरिक्त २ वर्षाकरिता वॉरंटी घेण्यात यावी. नविन वाहन खरेदीकरिता अंदाजपत्रकात तरतुद नाही. परंतु सन २०१०-११ या सालात १५ वाहने निर्लेखित केलेली आहेत त्यापोटी रक्कम रु.१७,००,०००/- इतकी जमा झालेली आहे. सदर रक्कमेतुन मा.महापौर यांना मुळ किंमत रुपये सात लाख पन्नास हजार व त्यावर इतर टॅक्स व साहित्यासाठी होणाऱ्या खर्चास नविन वाहन खरेदीबाबत मा.स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. अनिल सावंत** **अनुमोदक :- श्री. बर्नड डिमेलो**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम केला आहे.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५५ टाईप, महापौर वर्षा मॅराथॉन रोडरेस आयोजन करणेबाबत.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. सभापती साहेब. ह्याच्यात तरतुद ५ लाखाची आहे. मग, हे उरलेले १५ लाख म्हणणु आपण कुठून आणणार? कस काय करायच?

**अनिल सावंतः-**

आपण ५ लाखाला मंजुरी देतो ना.

**बर्नड डिमेलो :-**

प्रकरण क्र. ५५ चा ठराव टाईप करणे.

**चंद्रकांत मोदी :-**

इस ठराव को मेरा अनुमोदन है।

**अनिल सावंत :-**

ह्याच्यातुन न्यु अरायजन च काढून टाका. आणि इतर कुठची संस्था असेल कारण न्यु अरायजन ने २० लाखाचा बजेट दिला आहे. अणि आपल प्रोव्हिजन ५ लाखाची आहे. ५ लाखामध्ये ते करणार असेल तर ठिक आहे. नाहीतर दुसऱ्या संस्थेमार्फत करून घेवू.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आपण निविदा काढू. निविदामध्ये जे येईल ते काढू. पर्टिक्युलर कोणाला देता येणार नाही.

**बर्नड डिमेलो :-**

मग, नाव कशाला दिल?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौर साहेबांच पत्र असेल. त्यानुसार दिलेल आहे. आपण निविदा मागणार. आणि ५ लाखामध्ये जे बसतील त्याप्रमाणे करणार.

**निर्मला सावळे :-**

मा. सभापती साहेब, या ठिकाणी गोषवाऱ्यामध्ये उल्लेख केलेला आहे. मंडप उभारणे, बाहेरून येणाऱ्या खेळाडूंच्या, किंवा इतर पंचाचे इतर व्यक्ती जे आहेत त्यांची व्यवस्था करणे. तर गोषवाऱ्यामध्ये पूर्णपणे सविस्तर माहिती द्यायला पाहिजे होती. कारण, तुम्ही याच्यामध्ये काय-काय व्यवस्था करणार आहात. होर्डिंग्ज कुठे लावणार? बॅनर कुठे लावणार आहेत? स्टेज कुठे उभे करणार आहेत? त्यावर सविस्तर माहिती लिहिल्या नंतर आम्हाला सभागृहाला पण आयडिया येईल की, ह्याच्यामध्ये काय दुरूस्ती करता येईल. किंवा काय सुचना देता येईल? आणि कंपनीच नाव दिलेल आहे ते खरोखर काढुन टाका. आपण जाहिरात देवून त्याप्रमाणे मागु या. ५ लाखामध्ये जो चांगल्या प्रकारे खर्च करेल. त्याची पाहणी करूनच आपण त्यांना ते देण्यात याव.

**जुबेर इनामदार :-**

५ लाख रू. पुरले नाही तर?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब, आता आपण निर्णय घ्या. मा. महापौर साहेबांच पत्र आलेल की, २० लाख रू. लागतील म्हणुन जे ५ लाख रू. लागतील म्हणुन जे ५ लाख रू. मध्ये बसतील तेवढ आम्ही करणार.

**जुबेर इनामदार :-**

गेल्या वर्षी जो मॅरेथॉन झाला होता त्याला किती खर्च झाला होता?

**याकुब कुरेशी (प्रभाग सभापती) :-**

गेल्यावर्षीच्या खर्चाची माहिती द्याल तर बरं होईल.

**अनिल सावंत :-**

गेल्यावर्षी कस झाल की, ३-४ वेळा शहरामध्ये बोर्ड लावून डेट फायनलच होत नव्हती.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

नंतर आचार संहिता लागली होती. त्यामुळे ते होवू शकल नाही. अंदाजित ५ लाख मध्ये जे काय बसतील तेवढ करूया.

**याकुब कुरेशी :-**

मी काय बोलतो की, त्याच्या आदल्या वर्षाची झालेली ते दाखवा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

२० लाखाच्या आसपास झालेली.

**शरद बेलवटे :-**

१७ लाख २८ हजार रू. खर्च झाला होता.

**अनिल सावंत :-**

कधी झाला होता?

**शरद बेलवटे :-**

२००८-०९ मध्ये झाला होता.

**जुबेर इनामदार :-**

मग, आता ५ लाख रू. मध्ये कसे काय होणार?

**प्रविण पाटील :-**

१७ ला लाख रू. कसे झाले होते. त्याबद्दल डिटेलमध्ये सांगता थोडतरी सांगा. मंडपाला किती लागलेले वैगेरे.......

**जुबेर इनामदार :-**

पानपट्टे साहेब, आपल्याला पूर्णपणे कुठून नियोजन करता येईल का? कारण बजेटमध्ये प्रोव्हिजन म्हणून ८ लाख रू. खर्च सांगणार.

**निर्मला सावळे :-**

मा. आयुक्त साहेब, माझ्या माहितीप्रमाणे स्टेज खुर्च्या मंडपाचा आपण ठेका दिलेला आहे. दरवर्षीप्रमाणे चालतो. म्हणजे तो खर्च आपला वाचला पाहिजे. साडे सतरा लाख रू. तुम्ही कशावर खर्च केले? कशा पध्दतीने केले? हे पण आम्हाला सविस्तर कळवल पाहिजे. एवढा खर्च होतो का? एवढा खर्च अपेक्षित आहे का? आपल्याला ह्याच्यातुन किती खर्च वाचवता येईल हे पण पाहिल पाहिजे.

**शिवाजी बारकुंड :-**

हे साधारणतः मा. महापौर, मा. स्थायी समिती सदस्य यांच्या विचार विनिमयची स्पर्धा होती. सालाबाद प्रमाणेचा आहे. मा. महापौर आणि स्थायी समिती त्याप्रमाणे जो खर्च झालेला आहे. त्याची माहिती तुम्हाला पुढच्या मिटींगमध्ये देतो. मा. महापौर आणि स्थायी समिती हे विचार विनिमय करून ठरवतात. कशाप्रकारे आयोजन करायच?

**हेलन गोविंद :-**

सन २००९-१० मध्ये किती खर्च झालेला ते सांगा. म्हणजे माहिती पडेल अंदाजे कुठे-कुठे झाला तो आम्हाला सांगाना. सविस्तर माहिती असायला पाहिजे.

**निर्मला सावळे :-**

मा. सभापती साहेब, आपण म्हणता की, मा. महापौर साहेबांनी मागणी केल्याप्रमाणे आणि स्टॅण्डींग ने. तर स्टॅण्डींगला प्रशासकीय आर्थिक मंजुरी देण्याचा पूर्णपणे अधिकार आहे. परंतु, प्रशासनाचा याच्यात सर्वात मोठा भाग आहे. खर्च किती अपेक्षित आहे? किती करायला पाहिजे. आणि आपल्याला चांगल्याप्रकारे कमीत कमी करता येईल का? ते पण सर्वांनी मिळुन करायला पाहिजे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

तरतुदीप्रमाणे ऑर्गनाईझ करता येत.

**निर्मला सावळे :-**

१ वर्षाची तरतुदीमध्ये २० लाख रू. दिले. तर तेवढे संपवायलाच पाहिजे. अस इथे आहे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्याप्रमाणे ऑरगनाईझ करता येईल.

**निर्मला सावळे :-**

जर ५ लाखात चांगल होत असेल तर तस ही करू शकता ना.

**शिवाजी बारकुंड :-**

मा. महापौर आणि मा. स्थायी समिती सदस्य यांना आर्थिक मंजुरी देण्याचे अधिकार आहे. विचार विनिमय करून निर्णय घ्यावे.

**प्रविण पाटील :-**

मा. सभापती साहेब, ही ५ लाखाची तरतुद केलेली आहे. ती कुठे झालेली आहे? मा. महासभेत आणि स्थायी समिती मध्ये ना. त्यावेळेला काहीतरी विचार करूनच ही तरतुद केली असेल ना. मग, त्यावेळेला जास्त तरतुद करायला पाहिजे होती.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेब, ५ लाखामध्ये १७ लाख रू. तिथे खर्च झालेले आहे. ३ वर्ष अगोदर आणि आज आपण ५ लाखाची तरतुद आहे. आणि आपण तरतुद करतो. तर त्याच्यामध्ये काम होणे शक्य नाही ना. पूर्ण शहरमध्ये तो मॅरोथॉन चा कार्यक्रम राबवायचा आहे. तो होणार नाही. ज्या वस्तुंची गरज आहे ती आहे ना. ती काय कमी करता येत नाही. त्याच्यामध्ये म्युट्या करता येणार नाही. आपल्याला पूर्ण नियोजन कुठून करता येईल ते सांगा ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

पूर्ण नियोजन ५ लाखाच आहे. तर अडीचने आम्हाला मंजुरी द्या. आणि इतर विभागातुन कुठून आपल्याला उपलब्ध होतील त्याप्रमाणे करून घेवू.

**याकुब कुरेशी :-**

माझा सांगण्याचा उद्देश एवढाच आहे. २००८ ला जिकडे साडे सतरा लाख रू. खर्च येतो. तर २०१०मध्ये १० लाखामध्ये करायला जाईल तर ते कस काय होईल. करता तर व्यवस्थित करा.

**प्रविण पाटील :-**

पण ही ५ लाखाची तरतुद कुठच्या आधारे केलेली आहे? ही तरतुद कोणी केलेली आहे? आपणच केलेली आहे. काहीतरी आधार घेवूनच केलेली असेल ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्यावेळेला आपल बजेटच आवक किती आहे त्याप्रमाणे कटोती म्हणुन केलेली आहे.

**मा. सभापती :-**

ऑडीटर साहेब तुम्ही या आणि आम्हाला सांगा ५ लाख रू. कुठून घ्यायचे ते.

**शरद बेलवटे :-**

प्रत्येक विभागाला कळवाव लागेल. त्याच आता पर्यंत किती शिल्लक आहे.

**मा. सभापती :-**

आम्हाला कुठे ५ करोड, १० करोड घ्यायचे आहे. आम्हाला फक्त ५ लाखाची तरतुद पाहिजे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

पूर्ण विनियोजनची मंजुरी द्या. नंतर आम्ही दोघ जावून नंतर करू.

**मा. सभापती :-**

तुम्ही निर्णय घ्याना. हा विषय घेतलेला आहे. तुम्हाला माहिती आहे. की, हा विषय आणलेला आहे. आणि महापौर मॅरेथॉन होते. आणि ५ लाख रू. तरतुदी मध्ये होत नाही. तुम्ही अगोदरच हा विषय घ्यायचा होता.

**मदन उदितनारायण सिंह :-**

पूर्नविनियोजनचा विषय तुम्ही आणला पाहिजे होता आपल्याला अपेक्षित जास्त आहे. तर पूर्नविनियोजना विषय आणालया पाहिजे होता.

**जुबेर इनामदार :-**

मा.सभापती साहेब, हा विषय पुढच्या मिटिंगमध्ये ठेवा. त्याचा पूर्नविनियोजनाचा व्यवस्थित गोषवारा येवू द्या. कारण ५ लाख रू. मध्ये तुमची मॅरेथॉन होत नाही.

**याकुब कुरेशी :-**

होवूच शकत नाही. त्यामुळे सांगायचा उद्देश काय की, करायच तर व्यवस्थित करा नाहीतर करू नका.

**मा. सभापती :-**

शहरात मॅरेथॉन जे घेणार आहे. त्या ठेकेदाराशी आम्ही चर्चा केली. मा. महापौर साो., मी कमिशनर सोा., तर त्यांनी आम्हाला खर्च जो सांगितला आहे तो कमीत-कमी १२ ते १३ लाख रू. सांगितलेला आहे. जर वीस होत नसेल तर आम्ही कामामध्ये कटोती करू. कमीत कमी १२ ते १३ किंवा १० लाख तरी पाहिजे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब, पुढच्या स्टॅण्डींग मध्ये पुर्नविनियोजनचा प्रस्ताव आणतो.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. ५५ हे पुढच्या मिटींगमध्ये ठेवत आहे. सचिव साहेब आपण पुढचा विषय घेण्यात यावा.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५६, आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**जुबेर इनामदार :-**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | भाईदर (पुर्व) सिल्व्हर पार्क जक्शन येथे क्रॉस कनेक्शन करणे | रू.१४,६५,००४/- |
| २ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात अतिरीक्त फायर हायड्रंट पुरविणे व बसविणे. | रू.४९,८०,०००/- |
| ३ | भाईदर (प.) येथील नक्षत्र बिल्डींग ते श्री निधी हॉटेलपर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू.४६,६८,०४८/- |
| ४ | जनता नगर (काशी) वेस्टर्न पार्क रोड येथील नीलकमल इमारत ते भद्रा अपार्टमेंटपर्यंत जी.आय. जलवाहिनी बदलन नवीन बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू.१३,८५,०४५/- |
| ५ | भाईदर (प.) श्री निधी हॉटेल ते बालाजी कॉम्प्लेक्सपर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू.४६,८७,५३४/- |
| ६ | मिरा रोड (पुर्व) येथील पुजा नगर को.ऑ.हौ.सो. लि. ते नया नगर पोलीस चौकीपर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू.४९,७०,९२२/- |
| ७ | भाईदर (प.) तळवलकर जिम्नॅशियम ते सालासार पार्क पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू.४८,५८,९३५/- |
| ८ | मिरा रोड (पुर्व) येथील फ्लायओव्हर ब्रीजपासून ते पुजा नगर को.ऑ.हौ.सो.लि. पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू.४८,४०,६३२/- |

उपरोक्त कामांपैकी अ.क्र. २ चे काम करणेस यापुर्वी मे. के. अे. पाटील यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. आता अतिरीक्त काम करावयाचे असल्याने सदर कार्यादेशातील दर वाजवी व रास्त असल्याने उपरोक्त कंत्राटदारास पुर्वीच्याच दराने काम देणेस मंजूरी देण्यात येत आहे.

उपरोक्त अ.क्र. ३ ते ८ ही कामे जलवाहिनी पुरविणे व अंथरणेची असून तातडीने करावयाची आहेत. गेल्या आर्थिक वर्षात पाईप पुरविण्यात आलेल्या पुरवठादार मे. विंध्या ट्रेडर्स यांचे दर वाजवी व रास्त आहेत. यामुळे सदर पुरवठादाराकडून वरील कामांकरीता व अशा प्रकारच्या सर्व कामांकरीता पाईप खरेदी केल्यास वेळेची व आर्थिक बचत होउ शकेल. याकरीता वरील पुरवठादाराकडून मंजूर दरानुसार पाईप खरेदी करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

सबब उपरोक्त सर्व कामांकरीता येणाऱ्या खर्चास व याकामी वेळोवेळी येणारी देयके प्रदान करणेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**हेलन गोविंद :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदरचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ५६ :-**

आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. ४८ :-**


| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | भाईदर (पुर्व) सिल्व्हर पार्क जक्शन येथे क्रॉस कनेक्शन करणे | रू.१४,६५,००४/- |
| २ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात अतिरीक्त फायर हायड्रंट पुरविणे व बसविणे. | रू.४९,८०,०००/- |
| ३ | भाईदर (प.) येथील नक्षत्र बिल्डींग ते श्री निधी हॉटेलपर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू.४६,६८,०४८/- |
| ४ | जनता नगर (काशी) वेस्टर्न पार्क रोड येथील नीलकमल इमारत ते भद्रा अपार्टमेंटपर्यंत जी.आय. जलवाहिनी बदलन नवीन बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू.१३,८५,०४५/- |
| ५ | भाईदर (प.) श्री निधी हॉटेल ते बालाजी कॉम्प्लेक्सपर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू.४६,८७,५३४/- |
| ६ | मिरा रोड (पुर्व) येथील पुजा नगर को.ऑ.हौ.सो. लि. ते नया नगर पोलीस चौकीपर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू.४९,७०,९२२/- |
| ७ | भाईदर (प.) तळवलकर जिम्नॅशियम ते सालासार पार्क पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू.४८,५८,९३५/- |
| ८ | मिरा रोड (पुर्व) येथील फ्लायओव्हर ब्रीजपासून ते पुजा नगर को.ऑ.हौ.सो.लि. पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू.४८,४०,६३२/- |

उपरोक्त कामांपैकी अ.क्र. २ चे काम करणेस यापुर्वी मे. के. अे. पाटील यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. आता अतिरीक्त काम करावयाचे असल्याने सदर कार्यादेशातील दर वाजवी व रास्त असल्याने उपरोक्त कंत्राटदारास पुर्वीच्याच दराने काम देणेस मंजूरी देण्यात येत आहे.

उपरोक्त अ.क्र. ३ ते ८ ही कामे जलवाहिनी पुरविणे व अंथरणेची असून तातडीने करावयाची आहेत. गेल्या आर्थिक वर्षात पाईप पुरविण्यात आलेल्या पुरवठादार मे. विंध्या ट्रेडर्स यांचे दर वाजवी व रास्त आहेत. यामुळे सदर पुरवठादाराकडून वरील कामांकरीता व अशा प्रकारच्या सर्व कामांकरीता पाईप खरेदी केल्यास वेळेची व आर्थिक बचत होउ शकेल. याकरीता वरील पुरवठादाराकडून मंजूर दरानुसार पाईप खरेदी करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

सबब उपरोक्त सर्व कामांकरीता येणाऱ्या खर्चास व याकामी वेळोवेळी येणारी देयके प्रदान करणेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** **अनुमोदक :- श्रीम. हेलन गोविंद**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम केला आहे.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५७, ५८ अवलोकन आहेत.

**अनिल सावंत :-**

हे जे प्रकरण क्र. ५८ आहे. मा. आयुक्त साहेब ७३ (क) कलम आहे तो तुम्ही वाचा. तुम्ही आयुक्तांची मंजुरी घेता.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

१५ दिवसाच्या आत अवलोकन कराव अस आहे ना.

**अनिल सावंत :-**

हा खर्च कधीचा झालेला आहे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

१५ दिवसाच्या आत अवलोकन करावे अशी धारणा आहे. पण वर्षामध्ये करू शकतो.

**अनिल सावंत :-**

सहसा नाही. तुम्ही बी.पी.एम.सी. ॲक्ट वाचा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब, देयक अदा केलेल नाही. खर्च झालेला आहे. बुक केलेल आहे पण देयक केलल नाही.

**अनिल सावंत :-**

म्हणुन तुम्हाला सांगतो तुम्ही रूल्स वाचा. त्यामध्ये काय आहे ते त्यामध्ये पेमेंटच कन्सर्न नाही का? जे खर्च आयुक्तांच्या मंजुरीने झाले. ते १५ दिवसाच्या आत स्थायी समिती समोर यायला पाहिजे. मग हे खर्च कधी झालेले आहेत हे सांगा ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

बरोबर आहे. यापुढे सर्व विभाग प्रमुखांनी १५ दिवसाच्या आत खर्च जो केलेला आहे तो अवलोकन स्टॅण्डींग मध्ये आणावा.

**अनिल सावंत :-**

आम्हाला याला मंजुरीच द्यायची नाही. त्यांनी अस का केल? तो खर्च कधी झालेला आहे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

खर्च बुक झालेला आहे पण साहेब देयक अदा केलेल नाही.

**अनिल सावंत :-**

एवढ लेट का होत?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब, अजुन बिल अदा केलेल नाही.

**अनिल सावंत :-**

बिल देण्याच ७३(सी) मध्ये प्रोव्हिजनच नाही. इमरजन्सीमध्ये आयुक्तांना ते अधिकार दिलेले आहेत. १० लाखापर्यंत आयुक्त खर्च करू शकतात. आणि त्याची मान्यता १५ दिवसाच्या आत मा स्थायी समिती समोर घेतली पाहिजे. तुम्ही ६-६ महिन्यानंतर विषय कशाला आणता? राऊत साहेब ७३ (सी) च्या अंडर मान्यतेसाठी घेवून येतात. १५ दिवसाच्या आत स्टॅण्डींगला द्यायला पाहिजे ना. स्थायी समिती नेमली आहे. आणि तो खर्च

इमरजन्सीमध्ये करायचा माहे ६-६ महिने झाले हे देतच नाही. स्थायी समितीच्या मान्यतेला आजच्या आज सगळ्यांना सर्क्युलर काढून टाका.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

यापुढे अस होणार नाही याची खबरदारी घेवू.

**मा. सभापती :-**

पानपट्टे साहेब मी पण तुम्हाला हेच बोलणार होतो. अवलोकन बघा किती महिन्याच आणि काय आहे ते नियम कुठे आहे तुम्ही कारवाई काय करणार ते बोला. अवलोकनचा उशिर झाला २-२, ३-३, ६-६ महिने लावले. नियमात १५ दिवसाची मुदत आहे. हे कस चालेल?

**मदन उदितनारायण सिंह :-**

आचार संहिता पण लागली नव्हती की, आपली २ महिने मिटिंग झाली नाही. प्रत्येक वेळेला मिटिंग होते.

**याकुब कुरेशी :-**

मा. सभापती साहेब, सन्मा. सदस्य अनिल सावंत साहेब बोलले ना की हे अवलोकन पास करायच नाही. कमिशनर साहेबांना येवू द्या.

**मा. सभापती :-**

कशासाठी उशिर होतो ते सांगा.

**याकुब कुरेशी :-**

हे पेंन्डींग राहु द्या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब, यापुढे खबरदारी घेवू. परिपत्रक काढतो.

**मा. सभापती :-**

अजुन काही डिपार्टमेंटच अवलोकन बाकी आहे.

**अनिल सावंत :-**

म्हणजे स्थायी समितीला ते गृहित धरतात. वर्षापूर्वीच ते पास करणार.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. ५७, ५८ अवलोकन मंजूर करण्यात येत आहे.

**निर्मला सावळे :-**

मा. सभापती साहेब, प्रत्येक आठवड्यामध्ये मिटिगं होते. तर रितसर विषय घेवून या अशी माझी सुचना आहे.

**मा. सभापती :-**

आज कमिशनर साहेब नाही. आणि विषय पण आलेला आहे. अवलोकनचा विषय आहे. यापुढे अस जर काही घडलं तर निश्चितच विषय भले अवलोकनचा असेल तो पण आम्ही मंजुर करणार नाही. आज तुम्ही परिपत्रक काढा प्रत्येक डिपार्टमेंटला कळवा आणि त्याची प्रत पण आम्हाला दाखवा. आणि जे काही अवलोकन आहे ते पुढच्या मिटींगमध्ये आल पाहिजे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. सभापती साहेब, आता तुम्ही बोलले की, हे सर्व अधिकारी स्टॅण्डींग कमिटी ला गृहीत धरते. माझ म्हणन तेच आहे अस नेहमी होत. आपण प्रत्येक मिटींगमध्ये जे काही रूलिंग देतो. कोण लक्षात घेतच नाही. आपण २ वेळा ठरवल बस बघायला जायच. नंतर बसची काही चर्चाच नाही. शिवार गार्डन बघायला जायच. म्हणजे आपण इथे बोलायच म्हणुन बोलतो.

**अनिल सावंत :-**

मिरारोडला बस चालू होणार होती तर त्याच काय झाल? १५ ऑगस्ट को ५० बस चालू होने वाला था। वह किधर है ।

**मदन उदितनारायण सिंह :-**

अपुन इधर आकर क्या बोलते है क्या नही उसका कुछ किसिको लेना देना नही है।

**याकुब कुरेशी :-**

वही ४ एक महिनेसे सभागृह को बोल रहा हुॅं की, क्यो आते है? क्यो ठराव मंजूर करते? क्यो मंजूर करते है? मा. स्थायी समितीमे जे होता है उसकी भी यही हालत है। और मा. महासभेमे जो होता है उसकी यह अधिकारी को अपनी कुछ पडी नही है।

**मा. सभापती :-**

हम आपकी बातसे सहमत है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

हम आपके इसमे भी बोलते है। रूलिंग आप ही देते है। और बादमे आपकी रूलिंग कोई अर्थ नही निकलता. सब अधिकारी के साथ आपको भी पकड रहे है। क्योकी रूलिंग आपही देते है।

**मा. सभापती :-**

पानपट्टे साहेब, आज सर्व डिपार्टमेंटला आदेश देतील. अवलोकनचे विषय ताबडतोब द्यावे. २-२ मिटिंगमध्ये अवलोकनचे विषय ताबडतोब द्यावे. २-२ मिटिंगमध्ये अवलोकनचे सर्व विषय आले पाहिजे. नाही आले तर आपण जी रूलिंग दिलेली आहे त्या रूलिंगवर आपण ठाम असू.

**अनिल सावंत :-**

राऊत साहेब, मा. महासभेमध्ये आपला ठराव झाला होता. ज्या बिल्डींग ने रेन वॉटर हार्वेस्टींग आणि सोलर त्यांना आपण प्रॉपर्टी टॅक्स मध्ये रिबीट देणार होतो. तर त्याच पुढे काय झाल? त्याची प्रोसेस काय आहे? काही बिल्डींग ने तुम्हाला ॲप्लीकेशन पण केलेले आहे. त्याच व्हेरिफिकेशन कोण करणार? सर्टीफाय कोण करणार?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

त्यावेळेला जो प्रस्ताव आलेला. त्यावेळी नगररचना विभाग आणि अभियंता, पाणी पुरवठा आणि बांधकाम तिन्ही अभियंताने जावून सांगितल पाहणी करायला. त्याच्यानंतर ते करायच. पण बिल्डींग चे प्रस्ताव आले.

**अनिल सावंत :-**

पण, ते प्रस्ताव कोणाला द्यायचे? तुम्हाला प्रस्ताव द्यायचे?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

नगरचनाने प्रस्ताव द्यायचा.

**अनिल सावंत :-**

मग, नगररचने जवळ असे नाही प्रस्ताव आले आहे का?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

नगररचना विभागाने ते प्रस्ताव बाकीच्या उर्वरित २ डिपार्टमेंट कडुन घेवून ते करायच.

**अनिल सावंत :-**

ते ठिक आहे. तुम्ही तुमच प्रोसेस करा. पण त्यांना एक डेडलाईन द्या. म्हणजे फ्रॉर्म द डेट ऑफ ॲप्लीकेशन रिसीव्हड १५ दिवसाच्या आत त्यांनी रिपोर्टींग करायच आहे.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

१ महिना.

**अनिल सावंत :-**

ठिक आहे. १ महिना द्या. म्हणजे ॲप्लीकेशन आल्यानंतर त्याच्या बरोबर इतर काही डॉक्युमेंट सबमीट करायचे आहे. काही नाही ओन्ली दे व्हील व्हेरीफाय.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

साधारणतः आहे. ह्यांनी तुम्हाला हार्वेस्टींगसाठी जी टाकी बांधलेली आहे. पाण्याचा वापर आहे. पाण्याचा वापर त्या ४ महिन्याच्या गरजेशी सतत आहे. दुसरी गोष्ट की त्या पध्दतीने त्याने सेप्रेट लाईन टाकली का? तिसरी गोष्ट जे साठवलेल पाणी आहे ते त्यावेळी सरक्युलेट होत. प्रत्यक्ष घेतल जाते. त्यावेळी तिकडे नैसर्गिक फिल्टरेशनचा वापर केला किंवा नाही? ३ गोष्टीची हारवेस्टींगचा जो प्रकल्प आहे. हा मंजूर झाला दुसरी टाकी केली आणि पाईप दाखवली.

**अनिल सावंत :-**

मग, तुम्ही त्याला ह्या वर्षी पासुन रिबेट देणार आहे का?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

द्यायला हरकत नाही.

**अनिल सावंत :-**

धनेगाव साहेब, रेन हार्वेस्टींग मध्ये टॅक्स रिबेट मिळाव म्हणुन तुम्हाला काही प्रस्ताव आलेला आहे का?

**सत्यवान धनेगावे :-**

आमच्याकडे काही आलेले नाही.

**अनिल सावंत :-**

तुम्हाला लेटर आलेल आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

नाही आलेल आहे.

**अनिल सावंत :-**

ठिक आहे. आल्यानंतर राऊत साहेब बोलले की, एका महिन्याच्या आत तुम्ही तिन्ही डिपार्टमेंट ने रिपोर्ट देवून जो आपला ठराव झालेला आहे त्याप्रमाणे कारवाई करायच आहे.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

त्याच्यामध्ये एक चेक लिक बनवने आवश्यक आहे.

**अनिल सावंत :-**

चेक लिक एकदम हार्ड ॲन्ड फास्ट बनवू नका. पाणी वापरू हा मुळ हेतु आहे.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.) :-**

बिल्डर लोक वॉर्ड क्र. ३१, ३४ चा कम्प्लीट करायला काहीतरी थातुर-मातुर केलस दाखवतात.

**अनिल सावंत :-**

तस नको. ॲक्झॅटली जे पाणी वापरतात त्यांना ते रिबेट मिळाव.

**प्रकरण क्र. ५७ :-**

मा. आयुक्त सो., यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. ४९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागातील मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेल्या प्रस्तावांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | कंत्राटदाराचे नाव |
|---|---|---|---|
| १) | मेकॅनिकल वॉटर लेव्हल इंडिकेटर पुरविणे व बसविणे | रू.३,६२,५००/- | बावघर विभाग मजूर कामगार सह. संस्था मर्या. |
| २) | भाईंदर (प.) टेंभा रोड येथील सिंधुदूर्ग अपार्टमेंट येथे जलवाहिनी अंथरणे | रू.४८,४२५/- | मे. मानस कन्स्ट्रक्शन |
| ३) | घोडबंदर गाव किल्ला रोड येथे बिडाची जलवाहिनी अंथरणे | रू.१,९२,०४८/- | नितांत मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| ४) | जनता नगर (काशी) येथील जोगमाया किराणा स्टोअर्स ते लिबर्टी गेटपर्यंत जलवाहिनी अंथरणे. | रू.७४,२२४/- | नितांत मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| ५) | भाईंदर (प.) राई नाका ते शिवनेरीपर्यंत जलवाहिनी अंथरणे | रू.४,०६,६६४/- | चांगुणा मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| ६) | भाईंदर (प.) राई गाव व डब आळी ते नळ आळी (राम मंदिरापर्यंत) बिडाची जलवाहिनी अंथरणे | रू.३,१७,४२१/- | संगमेश्वर मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| ७) | उत्तन बस स्टॅन्ड ते लाईट हाउस परिसरात असलेली सिमेंटची जलवाहिनी बदलून बिडाची जलवाहिनी अंथरणे | रू.४,३०,५४५/- | ओम साई धाम मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| ८) | भाईंदर प. भोला नगर येथे बिडाची जलवाहिनी अंथरणे. | रू.३,३०,७९८/- | श्री अष्टविनायक मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| ९) | नर्मदा नगर येथील स्वाती इमारत ते गणेश भुवन इमारतीपर्यंत बिडाची जलवाहिनी अंथरणे | रू.२,६२,२५८/- | श्री अष्टविनायक मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| १०) | कनाकिया रोडवरील मधुबन इमारत ते रोझवूड इमारतीपर्यंत बिडाची जलवाहिनी अंथरणे | रू.३,०९,७८४/- | संगमेश्वर मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| ११) | भाईंदर (पुर्व) गोल्डन नेस्ट रोडवरील इंद्रलोक फेस नं.२ गेटपासून वामनराव पॅलेसपर्यंत बिडाची जलवाहिनी अंथरणे. | रू.६,११,१५६/- | संगमेश्वर मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| १२) | भाईंदर (पुर्व) कनाकिया रोड ते कमला पार्क पर्यंत जलवाहिनी अंथरणे. | रू.२,७७,१६७/- | श्री अष्टविनायक मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| १३) | भाईंदर पुर्व केबिन रोडवरील नर्मदा कुंज बिल्डींग ते राम गोपाल सदन इमारतीपर्यंत बिडाची जलवाहिनी अंथरणे. | रू.३,१३,९५४/- | नवजीवन मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| १४) | मिरा गाव मुन्शी कंपाउंड येथील अनमिना हॉटेल ते मश्जिद गल्ली व मुन्शी कंपाउंड अंतर्गत सि.आय. जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रू.४,६५,५५७/- | शिवपूत्र मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| १५) | मिरा रोड (पुर्व) पेणकरपाडा येथील सृष्टी गेट ते नताशा पार्क २ (दत्त मंदिर रोड) पर्यत सि.आय. जलवाहिनी अंथरणे. | रू.३,०५,५१०/- | शिवपूत्र मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| १६) | मिरा रोड येथील लकी बेकरी ते जयचंद प्लाझा येथे बिडाची जलवाहिनी अंथरणे | रू.२,७५,११९/- | ओम साई धाम मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| १७) | मिरा रोड (पुर्व) शांती नगर सेक्टर ११ च्या जलकुंभाजवळ बिडाची जलवाहिनी अंथरणे | रू.४,५७,३१२/- | नवजीवन मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| १८) | भाईंदर प. येथील रेल्वे स्टेशनजवळ रेल्वे समांतर जलवाहिनी स्थलांतरीत करून त्याऐवजी पोलादी जलवाहिनी पुरविणे व अंथरणे व रस्ता दुरूस्त करणे | रू.५,४३,२६०/- | श्री अष्टविनायक मजूर कामगार सह. संस्था मर्या |

| | | | |
|---|---|---|---|
| १९) | गोडदेव गावातील महानगरपालिकेच्या शाळेपासून बळवंत पाटील यांच्या घरापर्यंत बिडाची जलवाहिनी अंथरणे. | रू.३,८४,८४६/- | मोरया मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| २०) | भाईंदर (पुर्व) गोडदेव येथील महापालिकेच्या शाळेसमोरील चेंबर्स दुरूस्त करणे. | रू.१,९६,७८७/- | श्री अष्टविनायक मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| २१) | मिरा रोड (पुर्व) शांती पार्क हॅपी होम कॉम्प्लेक्सजवळ बिडाची जलवाहिनी अंथरणे | रू.९१,६०५/- | श्री अष्टविनायक मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| २२) | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नवघर येथील लोढा कॉम्प्लेक्स ते चंद्रावती प्लाझा इमारतीपर्यंत जलवाहिनी अंथरणे | रू.४,०६,३५६/- | जय विजय मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| २३) | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पाणटेकडी रोड येथील कलावती आईच्या मंदिरापर्यंत वितरण व्यवस्थेसाठी जलवाहिनी अंथरणे. | रू.१,६०,५५०/- | जय विजय मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| २४) | उत्तन येथील डॉन बॉस्को स्कूल ते धावगी डोंगराकडे जाणाऱ्या मार्गावर जलवाहिनी अंथरणे. | रू.१,६७,८६०/- | चांगुणा मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| २५) | मिभामनपा क्षेत्रातील नवघर गावातील जुन्या सिमेंटच्या जलवाहिन्या बदलून नविन बिडाची जलवाहिनी अंथरणे | रू.९,२३,५४३/- | चांगुणा मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| २६) | भाईदर पुर्व येथील फाटक जलकुंभ आवारातील अनुषांगिक कामे करणे. | रू.१,९०,२७३/- | शिवपूत्र मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| २७) | भाईंदर (पुर्व) फाटक जलकुंभाच्या आवारात सिमेंट काँक्रीट करणे. | रू.६,५६,७५५/- | शेई विभाग मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| २८) | मिभामनपा क्षेत्रातील एस. व्ही. रोड येथील नरेश स्टील शॉप ते लक्ष्मी सदन अपार्टमेंट पर्यंत नविन बिडाची जलवाहिनी अंथरणे. | रू.१,७४,८७४/- | कल्याणी मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| २९) | मिभामनपा क्षेत्रातील जेसल पार्क येथील सागर नं. १ ते उपासना बिल्डींग येथील सिवरेज लाईन बदलणे. | रू.१,७७,९९६/- | कल्याणी मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| ३०) | भाईदर पुर्व काशी नगर येथील रश्मी अपार्टमेंट ते आनंद पॅलेस पर्यंत बिडाची जलवाहिनी अंथरणे. | रू.१,४५,१५८/- | अंबिका मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| ३१) | नवघर येथील सुदर्शन गल्लीमधील सुदर्शन बिल्डींग ते सागर किरण इमारतीपर्यंत बिडाची जलवाहिनी अंथरणे. | रू.३,९४,०९५/- | शेई विभाग मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| ३२) | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडील ३० द.ल.लि. पाणी पुरवठ्यासाठी बांधण्यात आलेल्या ठाणे कापूरबावडी येथील पंपिंग स्टेशनचे टेरेस वॉटर प्रुफींग व पंपिंग स्टेशनबाबत इतर अनुषांगिक कामे करणे | रू.९,४३,५७३/- | धसई विभाग मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| ३३) | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडील ३० द.ल.लि. पाणी पुरवठ्यासाठी बांधण्यात आलेल्या ठाणे कापूरबावडी येथील पंपिंग स्टेशनलगत टॉयलेटचे बांधकाम करणे व वॉटर कुलर व इतर अंतर्गत कामे करणे. | रू.८,०६,८९४/- | शिवपूत्र मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| ३४) | काशी गाव येथील मश्जिद ते शितल बागपर्यंत सिमेंटची जलवाहिनी बदलून नविन बिडाची जलवाहिनी अंथरणे. | रू.१,६३,८२६/- | देवेंद्र मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| ३५) | काशी गाव येथील कला चाळ व अहमद पटेल चाळ येथे बिडाची जलवाहिनी अंथरणे | रू.८९,०१८/- | देवेंद्र मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| ३६) | मिरा गाव महाजनवाडी येथील महाविष्णू मंदिर ते हनुमान मंदिर येथे जलवाहिनी अंथरणे | रू.८,६४,०००/- | वाल्मिकी मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| ३७) | मिभामनपा क्षेत्रातील शांती नगर सेक्टर ५ येथील अे-५ या इमारतीसमोर इन्स्पेक्शन चेंबर बांधणे व सिवरेज लाईन बदलणे | रू.२,१०,४८०/- | प्रगती मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| ३८) | भाईदर (प.) येथील महानगरपालिका शाळा, सुभाषचंद्र बोस मैदान व मनपाची उद्याने येथे जी.आय. जलवाहिनी व फिटींग्ज पुरविणे व अंथरणे. | रू.४८,५६१/- | मे. निलेश एंटरप्राईजेस |

| | | | |
|---|---|---|---|
| ३९) | जनता नगर (काशी) येथील जरीमरी तलाव ते ग्रीन व्हिलेजपर्यंत जलवाहिनी अंथरणे | रू.५,६३,३०१/- | स्वस्तिक मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| ४०) | डाचकूलपाडा (लक्ष्मीबाग) येथे अंतर्गत बिडाची जलवाहिनी अंथरणे | रू.३,४१,२४९/- | शेई विभाग मजूर कामगार सह. संस्था मर्या |
| ४१) | **भाईंदर (प.) विभागात विंधन विहीरी खोदणे व हातपंप, सबमर्सिबल पंप बसविणे** | रू.९,६३,२६७/- | शंकर महादेव मजूर कामगार सह. संस्था मर्या. |
| ४२) | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात गौरव रो हाउस ते सॅटेलाईट पार्कपर्यंत बिडाची जलवाहिनी अंथरणे. | रू.६,०५,०६७/- | शेई मजूर कामगार सह. संस्था मर्या. |
| ४३) | **काशी, चेणा, वर्सोवा व मिरा विभागात विंधन विहीरी खोदणे व हातपंप बसविणे** | रू.९,६१,८१७/- | लुणंगदेव मजूर कामगार सह. संस्था मर्या. |
| ४४) | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात गोडदेव गावातील मनपाच्या शाळेपासून गोडदेव नाक्यापर्यंत असलेली जुनी सिमेंटची जलवाहिनी बदलून नविन बिडाची जलवाहिनी अंथरणे. | रू.५,४६,३४३/- | शेई मजूर कामगार सह. संस्था मर्या. |
| ४५) | **भाईंदर (प.) मुर्धा ते उत्तन विभागात विंधन विहीरी खोदणे व हातपंप बसविणे.** | रू.९,९९,१९६/- | श्री सिद्धनाथ मजूर कामगार सह. संस्था मर्या. |
| ४६) | शांती नगर सेक्टर ७ येथे उंच जलकुंभ येथे स्टार्टर व कॉपर केबल पुरविणे व बसविणे | रू.१,८५,०००/- | ओम मजूर कामगार सह. संस्था मर्या. |
| ४७) | पाणी पुरवठा देखभाल दुरूस्ती व वितरण व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी जेसीबी मशीनचा पुरवठा करणे. | रू.८,६०,०००/- | मे. राठोर ट्रान्सपोर्ट |

वरील कंत्राटदारांच्या व ठेकेदारांच्या संस्थांना स्विकारणेस तसेच त्याकामी येणारे देयक अदा करणेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ७३ खंड ड नुसार वरील प्रकरणांचे अवलोकन करण्यात आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. ५८ :-**

मा. आयुक्त सो., यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणे (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. ५० :-**

महापालिका आरोग्य विभागाकरिता डास अळीनाशके, दुर्गंधीनाशके, किटकनाशके, नेटलॉन जाळ्या खरेदी करणे तसेच संत ग़ाडगेबाबा स्वच्छता अभियान अंर्तगत पुस्तक छपाई, हस्तपत्रिका छपाई करणे, महापालिका क्षेत्रातील पर्यावरण सद्यस्थिती अहवाल बनविणे व प्रसिध्द करणे तसेच मनपा डंपर स्पेअर पार्ट दुरुस्ती कामे आदि कामे करण्यात आली आहेत. सदर कामी येणारा खर्च खालीलप्रमाणे आहे.

| क्र. | निविदाकाराचे नाव | कामाचा तपशिल | एकूण देय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | मे. रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन | Diflubenzuron 25% WP | रु. ९,३८,०००/- |
| २ | मे. रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन | Pyrosene Oil - E | रु. ७,५६,६००/- |
| ३ | मे. स्पाईक पेस्टोकेम प्रा.लि | VACCTOBAC-12 AS | रु. ६,७४,४४०/- |
| ४ | मे. ॲकॉर्ड इन्टरप्रायझेस प्रा.लि | ALPHA-CYPERMETHRIN | रु. ७,८०,०००/- |
| ५ | मे. लक्षता ट्रेडिंग कंपनी | Carbolic Powder | रु. ९,६६,०००/- |
| ६ | मे. गुरुकृपा एन्टरप्रायझेस | White Finoel | रु. १,००,०००/- |
| ७ | मे. रोहिणी एन्टरप्रायझेस | Netlon net Supply<br>(Bhayandar (w), Khari Gaon) | रु. ३,१३,५२५/- |
| ८ | मे. लक्षता ट्रेडिंग कॉर्पोरेशन | Netlon net Supply<br>(Mira Road (E)) | रु. ३,५९,९५०/- |
| ९ | मे. ॲकॉर्ड इन्टरप्रायझेस प्रा.लि | Netlon net Supply<br>(Murdhe to Uttan, Golden Nest, Navaghat, Mira to Chena) | रु. ३,०६,६५०/- |
| १० | मे. एनव्हायरो ॲनलिस्ट ॲण्ड इंजिनिअर्स प्रा.लि. | Envoirment Status Report | रु. ७,९१,०००/- |
| ११ | मे. साई प्रिन्टर्स ॲण्ड स्टेशनरी | 1) Hand Bill Printing | रु. ९,५००/- |
| | | 2) Report Book | रु. १७,९००/- |
| | | 3) Information Book | रु. १,१५,८००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 4) Introduction Book | रु. १९,६००/- |
| | | 5) Information Book in Three Colour Print | रु. २४,१२५/- |
| १२ | मे. वाय.सी. स्पेयर | M.B.MC. Dumper No Spare Part Repairing. | रु. २,३१,६००/- |
| १३ | मे. आशापुरा कन्ट्रक्शन कंपनी<br>मे. गुरुजी कंन्ट्रक्शन कंपनी | १९ टक्के रिजेक्ट मटेरियल उचलणेकामी डंपर, जे.सी,बी पुरवठा | रु. १०,००,०००/- |
| १४ | मे. साईसिध्दी डिस्ट्रीब्युटरर्स | झिंक फ़ॉस्फ़ाईड | रु. १,६७,२००/- |
| १५ | मे. रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन | केओथ्रीन प्लो | रु. ८,७५,०००/- |
| १६ | मे. रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन | किंग फ़ॉग १.२५ यु.एल.व्ही | रु. ६,८०,०००/- |

वरील कामांची खरेदी करणे कामी हि सभा मंजुरी देत असुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मा. स्थायी समितीच्या अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

स्थायी समितीच्या सर्व सन्मा. सदस्य, सदस्या उपायुक्त साहेब, सचिव साहेब सर्व अधिकारी वर्ग, आपण सगळ्यांनी आजची सभा ही खेळी मेळीच्या वातावरणात पार पाडली त्याबद्दल मी आपल्या सर्वांचे आभार मानतो आणि धन्यवाद करतो. तसेच आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

**(सभा संपल्याची वेळ दु. १.०० वा. )**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**